**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ. शी.** : अंबड-बीड रस्त्यावरील दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना द्यावयाची वाढीव मदत

**मु. शी.** : अंबड-बीड रस्त्यावरील दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना द्यावयाची वाढीव मदत यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री. बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

दिनांक 25 जुलै, 2011 रोजी जालना जिल्ह्यातील अंबड-बीड रस्त्यावरील झालेल्या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये 1 लाख ऐवजी प्रत्येकी रुपये 2 लाख मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभागृहाच्या निदर्शनास सदरची बाब आणून देण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ MMP/ AKN/

**अनुक्रमांक 2 वरील लक्षेवधी सूचना आधी घेण्याबाबत**

**तालिका सभापती** : यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, अनुक्रमांक 2 वरील लक्षवेधी सूचना आधी घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील वीरगाव येथे विवाहित मुलींवर बलात्कार करुन दरोडा टाकल्याची घडलेली घटना

**मु. शी.** : नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील वीरगाव येथे विवाहित मुलींवर बलात्कार करुन दरोडा टाकल्याची घडलेली घटना यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली, उल्हास पवार, मोहन जोशी, एस.क्यु.जमा, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, जयवंतराव जाधव, संदिप बाजोरिया, रमेश शेंडगे, अनिल भोसले, हेमंत टकले, किरण पावसकर, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील वीरगाव येथे 2 विवाहित मुलींवर त्यांच्या आई व इतर नातेवाईक महिलांसमोर बलात्कार करुन दरोडा टाकल्याची संतापजनक घटना जुलै महिन्यात घडणे, घटना घडल्यानंतर पोलीस ठाण्यात 5 ते 7 वेळा दूरध्वनी करुनही दूरध्वनी कोणीही न उचलणे, घटना घडून 15 दिवस उलटल्यानंतरही यातील आरोपींना पकडण्यात न येणे, घटनेसंबंधी पोलीस उप अधीक्षकांनी केलेले हास्यास्पद विधान, या घटनांमुळे परिसरातील महिलांमध्ये, नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, पोलीस प्रशासनास या घटनेचा तपास करुन आरोपींना अटक करण्यात आलेल्या अपयशामुळे या प्रकरणाची सी.आय.डी.चे विशेष पथक नेमून चौकशी करण्याची गरज, महिलांवर झालेल्या अत्याचाराची इनकॅमेरा चौकशी करण्याची

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

गरज, अत्याचारीत महिलांचे तातडीने पुर्नवसन करुन त्यांच्या कुटुंबीयांना धीर देण्याची आवश्यकता, दूरध्वनी उचलण्यात हयगय करणाऱ्या, घटनेसंबंधी हास्यास्पद विधान करणाऱ्या पोलीस उप अधीक्षकांवर कडक कारवाई करण्याची नितांत गरज, या संतापजनक घटनेप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आरोपी पकडले गेले आहेत. परंतु यापूर्वी कोठेवाडी येथेही दरोडा आणि बलात्काराच्या घटना घडल्या होत्या. या सगळ्या घटनेमध्ये पोलिसांची काय कार्यपध्दती असावी हा एक महत्वाचा प्रश्न आहे. वृत्तवाहिनीवर बोलत असताना पोलीस अधीक्षक श्री. कृष्णप्रकाश यांनी जाहीर केले की, दरोडेखोरांनी लाईट फोडले त्यामुळे अंधारामध्ये महिलांना काही दिसले नाही. आमचे म्हणणे असे आहे की, अशा प्रकारचे मुद्दे मीडियासमोर मांडले गेले की पोलिसांचाच तपास ढिला होतो आणि नंतर आरोपींचे वकील या संदर्भामध्ये गैरफायदा घेत असतात. आता आरोपी पकडले गेले असले तरी ते संशयीत आहेत. प्रत्यक्षातील आरोपी पकडले गेलेच नाहीत. या संदर्भामध्ये तपास कोठपर्यंत आलेला आहे ? पीडित महिला आणि हे जे संशयीत आहेत या दोघांचीही डीएनए टेस्ट करावी अशी मी स्वत: मागणी केली होती. तशी डीएनए टेस्ट केली आहे का आणि त्याचे रिझल्ट्स कधीपर्यंत मिळणार आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, अशा संवेदनशील घटनांमध्ये कोठल्या पध्दतीचे वक्तव्य असावेत या बाबतीत पोलीस महासंचालकांतर्फे निश्चितपणे सूचना दिल्या जातील. निवेदनामध्ये एक सुधारणा आहे. निवेदनामध्ये 4 लोकांना अटक केल्याचे म्हटले आहे पण पाचव्या व्यक्तीला सुध्दा अटक झालेली आहे. या आरोपींना मुद्देमालासह अटक झालेली आहे त्यामुळे ते संशयीत नाहीत. जो माल जप्त केलेला आहे त्याची पाहणी केल्यानंतर असा निष्कर्ष आलेला आहे की, जे काही दागिने चोरले होते ते त्याच व्यक्तीचे आहेत आणि त्या पध्दतीने त्याचा तपास झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी डीएनए टेस्टच्या संदर्भात प्रश्न विचारला. त्या संदर्भात माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटनेची चर्चा तीन आठवडे चाललेली आहे. मी स्वत: माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्याशी अकोले येथे असताना फोनवरुन संपर्क साधला. स्वत: श्री. कृष्णप्रकाश यांच्याकडे माहिती दिल्यावर त्यांनी सिव्हिल सर्जन यांना डीएनए टेस्ट करण्याच्या सूचना दिल्या. माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी स्वत: सांगितले की, डीएनए टेस्ट केली जाईल. आता विधिमंडळामध्ये माननीय गृह राज्यमत्री असे उत्तर देत

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आहेत की, मी माहिती घेऊन सांगतो. हे संशयीत आहेत की आरोपी आहेत ही बाब डीएनए टेस्टमधूनच सिध्द होऊ शकते. या बाबत उत्तर देण्यामध्ये एवढी दिरंगाई का होते ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, डीएनए टेस्ट करण्यासंदर्भातील सूचना दिलेल्या आहेत.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, नगर जिल्ह्यातील मागच्या अनेक वर्षातील ही एक भयानक घटना आहे. घटना घडल्यानंतर सात तास पोलिसांना बोलविण्याचा प्रयत्न करुन सुध्दा पोलीस घटनेच्या ठिकाणी पोहचू शकले नाहीत. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 4 आरोपी पकडले गेले. आताच माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले की, पाचवा आरोपी सुध्दा पकडलेला आहे. यामध्ये जो पंडित नावाचा आरोपी पकडलेला आहे तो सोनार आहे. पोलिसांनी असे सांगितले की, वीरगावमध्ये जे सोने चोरीला गेले, त्या दरोडेखोरांनी बलात्कार करुन जे सोने लुटले ते पंडित नावाच्या आरोपीजवळ दिले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 10:35

श्री.धनंजय मुंडे...

पंडितने पोलिसांना दिलेल्या स्टेटमेण्टमध्ये असे सांगितले आहे की, ते सोने वीरगावचे नाही. त्यामुळे बीड जिल्हयातील आजुबाजूच्या सर्वसामान्य लोकांमध्ये अशी चर्चा आहे, असा संशय निर्माण झाला आहे की, ज्यांना पोलिसांनी पकडलेले आहे ते खरे आरोपी आहेत काय, या आरोपींना पकडण्यापूर्वी 2 आरोपींना पकडण्यात आले होते. त्यांची चौकशी केल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले. त्यानंतर 4 आरोपींना पकडण्यात आले होते. त्यापैकी 3 दरोडेखोर व बलात्कार करणारे आहेत व एक सोनार आहे आणि आता पाचव्या आरोपीला पकडल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, या पर्टिक्युलर केससाठी पोलीस विभागाने 4 तपास अधिकाऱ्यांना बदलले आहे. पहिले अधिकारी होते त्यांना निलंबित केले, त्यानंतर डी.वाय.एस.पीं.ना नेमले पण त्यांनाही नंतर बदलले. त्यानंतर श्रीमती अंबिका यांना आणले नंतर त्यांनाही बदलले आणि त्यानंतर श्रीमती ज्योती प्रिया यांना नेमले होते त्यांनाही बदलले आहे. याचा अर्थ असा आहे की, सर्वसामान्य लोकांमध्ये संताप निर्माण झालेला आहे. एवढी मोठी घटना घडल्यामुळे पोलीस विभागाने आतापर्यंत 4-4 अधिकाऱ्यांना बदलले आहे.

दुसरे असे की, या पीडित महिलांना 1 लाख रुपयांचा चेक दिला आहे त्या चेकचे पैसे त्यांच्या अकाऊण्टमध्ये या क्षणापर्यंत सुध्दा जमा झालेले नाहीत. त्या लोकांच्या दवाखान्याचा संपूर्ण खर्च शासन करील असे सांगण्यात आले होते, परंतु दवाखान्याच्या खर्चाचा एक रुपया सुध्दा शासनाने दिलेला नाही. तसेच जखमींना 50 हजार रुपये देण्याचे घोषित केलेले आहे ते सुध्दा त्यांना मिळालेले नाहीत. आज जवळजवळ या घटनेला 1 महिना होत आहे. अशा भयंकर घटनेसंबंधी शासनाच्या अशा संवेदना असतील तर ते योग्य नाही. म्हणून मला आपल्यामार्फत शासनाला विनंती करावयाची आहे की, हा विषय व्यवस्थितरितीने मार्गी लावावा. पीडित महिलांवर बलात्कार झालेला आहे, वस्तीवर दरोडा पडलेला आहे, त्या महिलांचे योग्य पध्दतीने पुनर्वसन करावे. इंदिरा गांधी योजनेंतर्गत त्यांना महिना 500 रुपये, 200 रुपये देऊन त्यांचे पुनर्वसन होणार आहे काय ? या महिलांचे योग्य पध्दतीने पुनर्वसन करावयाचे असेल तर ते सर्वार्थाने होणे आवश्यक आहे. या दोन्ही मुली आपल्या वडिलांच्या दहाव्याच्या विधीसाठी आल्या होत्या. माहेरी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

श्री.धनंजय मुंडे.....

आल्यावर त्यांच्यावर बलात्कार होतो, घरावर दरोडा पडतो. उद्या या महिला आपल्या सासरी गेल्यावर तेथे त्यांची काय अवस्था होणार आहे याचा विचार आपण करु शकत नाही. म्हणून त्या महिलांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे, त्या संपूर्ण वस्तीचे योग्य पुनर्वसन केले पाहिजे. ही घटना घडल्यानंतर वीरगाव व अकोले येथे सर्व पक्षीय बंद पाळण्यात आला होता. त्याच्या दुसऱ्या दिवशी ही अटक दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे या सर्व केसबाबत संशयाचे वातावरण निर्माण झ ाालेले आहे. बलात्कार करणाऱ्या व दरोडेखोरांविरुध्द कठोर कारवाई तर केलीच पाहिजे, शिवाय या घटनेची सर्वंकष चौकशी करण्यात यावी आणि त्या महिलांचे योग्य पध्दतीने पुनर्वसन करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर साडेसहा तास घटनास्थळी पोलीस पोहोचले नव्हते असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे ती वस्तुस्थिती नाही. सकाळी 6.15 वाजता पोलिसांना फोन आल्यावर 8.30 वाजता गुन्हा रजिस्टर केलेला आहे. श्री.यादव नावाचे पोलीस कॉन्स्टेबल तेथे सकाळी 6.15 वाजता पोहोचले होते. सुलतान शेख व पीएसआय श्री.एस.के.पाटील यांनी खबरदारी घ्यावयास पाहिजे होती ती न घेतल्यामुळे या दोघांना निलंबित केलेले आहे. महिलांच्या पुनर्वसना बाबत मी सांगेन की, या दोन्ही महिलांना संजय गांधी योजना किंवा श्रावण बाळ या योजनेंतर्गत समाविष्ट करण्याचा यापूर्वी निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी चेकबाबत संशय व्यक्त केला आहे. माननीय मुख्यमंत्री फंडातील निधीचा चेक आहे. त्यामुळे त्या चेकबाबत कोणतीही शंका बाळगू नये अशी मी विनंती करतो. इंदिरा आवास योजनेंतर्गत त्यांना घर देता येईल काय किंवा वेगळ्या उपाययोजना करता येतात काय त्याही बाबतीत शासनातर्फे प्रयत्न केला जाईल.

श्रीमती शोभ फडणवीस : सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितल्या प्रमाणे पीडित महिलांना 1 लाख रुपये व जखमींना 50 हजार रुपये देण्याची शासनाने घोषणा केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अपुर्वमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:40

श्रीमती शोभा फडणवीस...

हे 50-50 हजार रुपये का मिळालेले नाहीत अशी विचारणा जेव्हा एस.पी. आणि जिल्हाधिका-यांना करण्यात आली त्यावेळी याबाबतीत आम्हाला कोणतेही आदेश नाहीत असे त्यांनी सांगितले. जखमींना 50 हजार रुपये देण्याची शासनाने घोषणा केलेली आहे. काही महिलांचे डोके फुटले, हात मोडले, कान फाटले. त्यांना कोणतीही मदत देण्यात आलेली नाही. केवळ नाशिक येथील रुग्णालयामधून सलाईन लावून आणि गोळया देऊन परत पाठविले. माझे म्हणणे असे आहे की, सरकार जे काही बोलते ते तरी निदान करावे. तेव्हा जखमींना तातडीने 50 हजार रुपये देणार आहात काय ?

सभापती महोदय, दुर्दैव असे की त्या गावामध्ये पोलीस महासंचालक आणि पोलीस अधीक्षक हे रात्रभर तेथे असताना अगस्तीमुनी मंदिर आणि पांडवकालीन लेण्यामधील चांदीच्या पादुका चोरीला गेल्या, तसेच एका मंदिराचा पितळेचा मुकुट चोरीला गेला. म्हणजे पोलीस महासंचालक आणि पोलीस अधीक्षक गावामध्ये हजर असताना आजूबाजूच्या परिसरामध्ये चो-या, दरोडे घालून पोलिसांना त्यांनी चॅलेंज दिलेले नाही काय ? पोलीस महासंचालक आणि पोलीस अधीक्षक असताना चो-या आणि दरोड्यांचे प्रकार होत असतील तर हे पोलीस खाते लोकांचे संरक्षण कसे करणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. अजूनही त्या गावातील लोकांच्या घरावर रात्रीच्या वेळी लाथा मारल्या जातात, दगड मारले जातात. त्या गावात दशहतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. याबाबत शासन कोणती तातडीची उपाययोजना करणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सन्माननीय सदस्यांनी 50 हजार रु. मदतीचा उल्लेख केला. लवकरात लवकर हे धनादेश देण्याची व्यवस्था करण्यात येईल. कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राखलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे तशा प्रकारची कोणतीही घटना आढळून आलेली नाही. त्या ठिकाणी भरपूर पोलीस बल देऊन चोख बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तीन चो-यांचा तपास चालू आहे. त्याचे धागेदोरे लवकरच मिळतील.

श्रीमती दिप्ती चवधरी : अत्यंत दुर्दैवी, खेदजनक आणि संतापजनक अशी घटना घडलेली आहे. पीडित महिलांच्या पुनर्वसनाची जबाबदारी सरकार घेणार आहे काय ? माझी शासनाला विनंती आहे की,या पीडित महिलांच्या संपूर्ण पुनर्वसनाची जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी...

सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितल्या प्रमाणे त्या विवाहित महिला होत्या. त्यामुळे त्यांच्या घरची परिस्थिती काय असेल याची आपण कल्पना करु शकतो. तेव्हा या पीडित महिलांना घरे देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : मघाशी सांगितल्या प्रमाणे शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून त्यांना घरे देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : या पीडित महिलांचे श्रावणबाळ योजना किंवा अन्य योजनांतर्गत अजूनही पुनर्वसन झालेले नाही. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी एका घराचे भूमिपूजन केलेले आहे. 9 जुलैला घटना घडली. आज 28 जुलै तारीख आहे. अजूनही यंत्रणा जागी होत नाही. तेव्हा या पीडित लोकांना शासन केव्हा मदत करणार ? मदत देण्याची प्रक्रिया उद्यापासून सुरु करणार काय ?

श्रीमती अलका देसाई : नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील वीरगाव येथे घडलेली घटना जिजाऊच्या महाराष्ट्राला, राणी लक्ष्मीबाईच्या महाराष्ट्राला भूषणावह आहे असे माझ्यासारख्या एका स्त्री कार्यकर्तीला वाटत नाही. महाराष्ट्र आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आघाडीवर आहे. असे असताना दरोडे घातले जातात, महिलांवर त्यांच्या नातेवाईकांसमोर बलात्कार केले जातात ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. ही कोणती संस्सकृती आहे याचे संशोधन करायला पाहिजे. अशा प्रकारच्या काही घटना घडल्या की शासन पीडितांना आर्थिक मदत जाहीर करते. ही मदत पीडित महिलांना केव्हा दिली जाणार आहे ?

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ AKN/ MMP/ 10:45

श्रीमती अलका देसाई..... लक्षवेधी सूचना क्र.2...

या ज्या दोन विवाहित महिला सासरी जाणार आहेत त्यांच्या भवितव्याची काय काळजी घेणार आहात? मंदिरातील दागिने चोरीला जाणे हा विषय वेगळा आहे. परंतु संताप हा त्या मुलींच्या पुनर्वसनाच्या संदर्भात आणि त्यांच्यावर झालेल्या बलात्काराच्या संदर्भात आहे. या प्रश्नाबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, अनेक प्रश्नांची उत्तरे मी यापूर्वीच दिली आहेत. समाजाची मानसिकता बदलणे हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. एका बाजूला महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचे धोरण आपण स्वीकारले आणि दुसऱ्या बाजूला महिलांवरील अत्याचार व पुरुषांची मानसिकता हा देखील चर्चेचा विषय तुम्हा आम्हा सर्वांसमोर आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे म्हटले जाते. या राज्यामध्ये अशा घटना घडू नयेत याची जबाबदारी निश्चितपणे शासनाची आणि आपल्या सर्वांचीच आहे. भविष्यकाळात समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. पुनर्वसनाच्या विषयाबाबत मी अगोदरच सांगितले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, वीरगावच्या परिसरातील घटनेच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित झालेली आहे. घडलेली घटना निश्चितपणे संतापजनक आहे. शासनामार्फत या घटनेची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल. परंतु ज्या दिवशी ही घटना घडली त्या अगोदर संबंधित गावकऱ्यांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिलेली होती. पोलीस ठाण्याकडून त्या तक्रारीची दखल घेतली गेली असती आणि गावकऱ्यांना संरक्षण मिळाले असते तर कदाचित ही दुर्दैवी घटना घडली नसती. अशा प्रकारच्या ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्यांची दखल घेतली आहे का? दखल घेतली नसल्यास का घेतली नाही? दखल घेतली असल्यास काय उपाययोजना केली आहे?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : अशा प्रकारच्या तक्रारी येतील त्यांची ताबडतोब दखल घेतली पाहिजे अशा सक्त सूचना दिलेल्या आहेत. या प्रकरणी दखल घेतली नाही म्हणून दोन अधिकाऱ्यांना निलंबीत केले आहे. भविष्यकाळात अशा घटना घडू नयेत या संदर्भात ज्या ज्या ठिकाणी तक्रारी प्राप्त होतील त्याची दखल योग्य वेळी घेतली पाहिजे अशा सूचना दिलेल्या आहेत. मधल्या काळात केंद्र सरकारने प्रत्येक राज्याला व्हिक्टीम कॉम्पेन्सेशन स्कीम तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन तशा पध्दतीची स्कीम तयार करीत आहे. अशा घटना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील.....

घडू नयेत यासाठी निश्चितपणे दक्षता घेण्यात येईल. दुर्दैवाने अशी घटना घडली तर अन्यायग्रस्त व्यक्तीला कोणत्या पध्दतीने कॉम्पेन्सेशन मिळावे यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेत आहे. भविष्यकाळात कॅबिनेटमध्ये मंजुरी मिळाल्यानंतर चांगल्या पध्दतीची कॉम्पेन्सेशन स्कीम अंमलात आणणार आहोत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या प्रशासनाला काळीमा फासणा-या घटना राज्यात घडतात त्यावेळी अशा घटनांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. ज्यावेळी असा गुन्हा घडतो त्यात पूर्वीच्या गुन्ह्यांप्रमाणे साम्य असेल तर गुन्हेगार कदाचित तेच असतात. पोलीस यंत्रणा अशा गुन्हेगारांना शोधून काढू शकते. कोठेवाडीच्या घटनेमध्ये अशाच प्रकारचा दरोडा पडला होता आणि अत्याचाराची घटना घडली होती. त्या गुन्हयात सापडलेले आरोपी या घटनेमध्ये सामील आहेत काय? राज्यात गुन्हे करणाऱ्यांचे समूह आहेत. अशा समुहांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय? अत्याचारग्रस्त महिलांची इन कॅमेरा चौकशी करण्याची गरज वाटत नाही असे उत्तरामध्ये नमूद केले आहे. कोठेवाडीच्या खटल्याची चौकशी न्यायालयात सुरु झाली त्यावेळी अनेक गोष्टी उघडकीस आल्या. महिलांवर अत्याचार करणारे जे आरोपी होते त्याची माहिती जनतेला नव्हती. परंतु या खटल्यामुळे ती माहिती उघडकीस आली. आज अत्याचारग्रस्त महिला सासरी गेलेल्या आहेत, आपल्या कुटुंबासमवेत रहात आहेत. त्यांना समाजामध्ये फिरणे अशक्य झाले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोठेवाडी प्रकरणातील महिला सुखात नांदत आहेत. मी अधूनमधून त्यांची भेट घेत असते. माननीय सदस्यांनी चुकीची माहिती सभागृहाला देऊ नये.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. भोगले...... 10:50

लक्षवेधी सूचना क्र. 1........

श्री. रमेश शेंडगे : महोदय, कोठेवाडी येथील घटनेच्या संदर्भात अगोदरच वर्तमान पत्रातून बातम्या बाहेर आल्या होत्या. तसेच मी त्या काळात स्वत: तेथे जाऊन आलो होतो. म्हणून असा खटला "इन कॅमेरा" चालविणे हे सामजिक बांधिलकीच्या भावनेतून आवश्यक आहे. जेणेकरुन त्याचा अत्याचारग्रस्त महिला व इतर नातेवाईकांना त्रास होणार नाही. म्हणून शासन यासंबंधीचा निर्णय घेणार आहे काय, त्याचबरोबर शासनाने यासंदर्भात उपाययोजना करताना घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली असे म्हटले आहे. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त व उप आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या समित्यांमध्ये महिला डॉक्टर, महिला वकील, प्राध्यापिका तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आल्याचे सुध्दा सांगितले आहे. असे किती कक्ष या जिल्ह्यात स्थापन करण्यात आले, त्यापैकी किती ठिकाणी हे कक्ष कार्यरत आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, "इन कॅमेरा" खटला चालविण्याबाबतची जी सूचना केली. त्यासंदर्भात मागणी आली तर तसा निर्णय जरुर घेतला जाईल. तसेच प्रत्येक जिल्ह्यात आपण महिला सहाय्य कक्ष निर्माण केलेले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, उत्तरात इन कॅमेरा तपास करण्याची गरज वाटत नाही असेही संबंधित अधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे, त्या अधिकाऱ्याला शासनाने समज देणे आवश्यक आहे. तसेच अत्याचारग्रस्त महिलांची नावे गुप्त राहिली पाहिजेत याचाही विचार करावा. नगर जिल्ह्यातील एक वर्तमान पत्रातून या महिलांचे फोटो सुध्दा छापले होते, त्याबद्दल मी तक्रार केली आहे की ज्या वर्तमान पत्राते असे छायाचित्र प्रसिध्द केले त्या वर्तमान पत्रावर कारवाई करण्यात येणार आहे काय, यापूर्वी दरोडे पडू नये म्हणून दरोडा प्रतिबंधक पथकाने कोणती कारवाई केली यासंदर्भात कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चेत आम्ही बोलणारच आहोत. पण अत्याचारग्रस्त महिला या संपूर्णपणे निरक्षर आहेत, त्यांना हिंदी भाषा बोलता येत नाही. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, कोठेवाडीच्या केसमध्ये ज्याप्रमाणे रश्मी करंदीकर नावाच्या एक चांगल्या महिला अधिकारी नेमल्या होत्या त्याच धर्तीवर या केस मध्ये सुध्दा चार्जशीट दाखल होऊन कोर्टात केस उभी राहीपर्यंत मराठी भाषेची जाण असणारी महिला अधिकारी नेमण्याची भूमिका शासन घेणार आहे काय ? तसेच अकोले येथे पोलीस स्टेशन कार्यरतच नाही, हे खरे आहे काय ?

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1........

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मराठी भाषा जाणणारी महिला अधिकारी असावी या सूचनेचा विचार जरुर केला जाईल. ही महिला अधिकारी सिनियर पी.आय. च्या दर्जाचा असेल. दुसऱ्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी असे स्पष्ट करु इच्छितो की, अकोले येथे पोलीस स्टेशन कार्यरत आहे. मधल्या काळात त्याची मोडतोड झाली तेव्हा दुसऱ्या ठिकाणी होते पण आता दुरुस्ती झाल्यानंतर पुन्हा त्याच जागेवर हे पोलीस स्टेशन आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, माझी विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी मराठी भाषा जाणणाऱ्या महिला अधिकाऱ्याचे नाव तरी समजले पाहिजे, असे आपण शासनाला निदेश द्यावेत.

श्री. धनंजय मुंडे : महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, मुख्यमंत्री निधीतून चार दिवसांपूर्वी मदतीचे धनादेश देण्यात आलेले आहेत. हे धनादेश किती तारखेपर्यंत वटतील? तसेच या महिलांवरील अत्याचार रोखण्याच्या संदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर तरतुदींमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असे शासनाने सांगितले. त्या समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे काय, नसल्यास किती दिवसात तो प्राप्त होणार आहे? त्याचबरोबर नगर जिल्ह्यात प्रथम कोठेवाडी, शिरसाटवाडी, आचलगांव आणि वीरगांवची चौथी घटना आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे..

मराठवाडयातील काही जिल्हयांमध्ये अशा प्रकारच्या घटना नेहमी घडत असतात त्यामुळे या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून आपण काही उपाययोजना करणार आहात काय ? ज्या ठिकाणी ही घटना घडलेली आहे त्या ठिकाणी आज पोलीस बंदोबस्त चोख आहे हे मी सुध्दा मान्य करतो. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, वीरगाव बीटच्या अंतर्गत 32 गावे येतात. या 32 गावांसाठी केवळ 2 कॉन्स्टेबलची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ज्यावेळेस त्या दिवशी दोन कॉन्स्टेबलपैकी एक कॉन्स्टेबल रजेवर होता व एकच कॉन्स्टेबल ड्यूटीवर होता. त्यामुळे बीट मधील गावांची संख्या कमी तरी केली पाहिजे किंवा पोलिसांचा बंदोबस्त तरी वाढवला गेला पाहिजे. शासनाने 44 हजार पोलिसांची भरती केलेली आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. परंतु मला असे विचारावययाचे आहे की, बीट मधील गावे कमी केली जाणार आहेत की, बीट मधील पोलिसांची संख्या वाढवली जाणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, कालच माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, जेथे जेथे पोलिसांची आवश्यकता लागेल त्या त्या ठिकाणी पोलीस उपलब्ध करुन दिले जातील. ही घटना ज्या ठिकाणी घडलेली आहे त्या पोलीस स्टेशनला योग्य तो स्टाफ सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या ठिकाणी चेक क्लिअरन्सच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे परंतु मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, चेक क्लिअरन्सच्या बाबतीत आपण मनामध्ये कोणत्याही प्रकारची शंका आणू नये. एक दोन दिवसात चेक क्लिअर होतील.

सभापती महोदय, दुसरे असे की, जस्टीस धर्माधिकारी यांचा अंतरिम अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. अधिवेशन झाल्यानंतर या समितीची एक बैठक आयोजित केली जाणार असून त्या अहवालामध्ये महिलांच्या अत्याचाराच्या संदर्भात ज्या ज्या सूचना असतील त्या अमलात आणण्याच्या दृष्टीने टाईम बाऊंड प्लॅन निश्चितपणे केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :मौजे केट्टापाट(ता. कळमेश्वर,जि.नागपूर) येथील रिक्षा अपघातामध्ये 14 जणांचा झालेला मृत्यू

**मु. शी.** : मौजे केट्टापाट(ता. कळमेश्वर,जि.नागपूर) येथील रिक्षा अपघातामध्ये 14 जणांचा झालेला मृत्यू यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, ॲड. उषाताई दराडे, सर्वश्री रमेश शेंडगे, विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे केट्टापाट (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथे दिनांक ८ जून, २०११ रोजी रिक्षावर ट्रेलर उलटून झालेल्या अपघातात १४ जण ठार तर ६ जण गंभीर जखमी होणे, परिणामी सदर परिसरात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, सदर घटनेत मृत झालेल्यांच्या कुटुंबीयांना तसेच जखमींना त्वरित मदत मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, दुर्दैवी अपघाताचे विषय सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित करीत असतात. अपघातांच्या संदर्भात शासनाकडून कोणती उपाययोजना केली जात आहे व कोणती उपाययोजना केली जात नाही याचा लेखा सभागृहाच्या समोर यावा व कामामध्ये सुधारणा व्हावी या उद्देशाने सन्माननीय सदस्य प्रश्न उपस्थित करीत असतात. वृत्तपत्रामध्ये या अपघाताच्या बाबतीत जी बातमी छापून आलेली आहे त्यामध्ये 14 जणांचा मृत्यू झालेला आहे अशी माहिती दिलेली आहे व मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये 12 जणांना मृत्यू झालेला आहे अशी माहिती त्यांनी दिलेली आहे. खरे म्हणजे मृतांची आकडेवारी सारखी असणे आवश्यक आहे. त्यामुळे तपास करणा-यांनी मृतांची आकडेवारी सारखी येईल याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण देशाचा विचार केला तर आपल्या राज्यात रस्त्यावरील अपघात जास्त होत असतात. आपल्या राज्यातील रस्त्यावरील अपघातांची आकडेवारी गेल्या 3-4 वर्षापासून वाढते आहे. रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने वाहन चालकांनी कायद्याचे उल्लंघन करणे, मद्य प्राशन करुन वाहन चालवणे, महामार्गावर आवश्यक ते बोर्ड नसणे यामुळे अपघात मोठया प्रमाणात होत असतात. रत्यावरील अपघात कमी होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात नसल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ होते हे आपल्याला दिसून येते. ट्रॅफिक पोलीस आपली बदली योग्य त्या ठिकाणी करुन घेण्यासाठी स्पर्धा लावत असतात. ही स्पर्धा का लागते याचे कारण या ठिकाणी उघड करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. अशा प्रकारे बदली करुन किंवा नियम बाहय गोष्टींना ....

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

अनधिकृतरित्या परवानगी दिली जात असेल तर ती देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबत शासन काय करणार आहे? आपण सुरक्षा अभियान राबविले आहे. वैद्यकीय शिबिरे घेतली आहेत. बैलगाड्यांना रिफ्लेक्टर लावले आहेत. सगळे सालाबाद प्रमाणे सुरूच असते. ही जबाबदारी एका आठवड्यापुरतीच, पंधरवड्यापुरतीच आपल्यावर असते का ? आपण बारा महिने रात्रंदिवस या वाहतुकीच्या समस्येकडे एका वेगळ्या पद्धतीने बघितले पाहिजे. यासाठी आवश्यक असले तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्याची व्यवस्था खात्यामध्ये केली पाहिजे. काल या सभागृहात दिंडीमध्ये घुसलेल्या ट्रेलर संबंधी देखील चर्चा झाली. ट्रेलर वाहतूक या विषया संबंधी आपण स्पेशलायझेशन करावे. ट्रेलर वाहतूकीचा प्रश्न मोठा आहे. ट्रेलर वाहतुकी संबंधी असलेल्या नियमांचा पुनर्विचार करून त्यात काही तरी कडक बंधने समाविष्ट करणे आवश्यक आहे असे मला वाटते. अपघातात निष्पाप नागरिक बळी पडलेले आहेत. आपल्या लेखी उत्तरामध्ये जखमींना मदत देण्यासंबंधीचा व विम्याचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. आपल्या व्यवस्थेमध्ये असलेल्या त्रुटीमुळे निष्पाप नागरिक बळी पडलेले आहेत. त्याची जबाबदारी स्वीकारून आपण मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुबीयांसाठी शासन सहानुभूतीपूर्वक विचार करून काही मदत करेल काय, या बद्दल देखील सन्माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मूळात हा आकडा 13 च आहे. 12 जण हे जागेवरच ठार झाले होते व 13 वा इसम हा रूग्णालयामध्ये मृत्यू पावला आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने जो आकडा दिला आहे तो योग्यच आहे. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. महाराष्ट्रातून अनेक नॅशनल व स्टेट हायवे जातात. वाहतूक ही एक मोठी समस्या आहे. वाहतुकीचे सर्वात जास्त चलन हे महाराष्ट्रात होते. एक आठवड्याचा केंद्र शासनाने वाहतूक सुरक्षा सप्ताह राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्या होत्या. राज्यातील अपघातांची परिस्थिती पाहता आपण सुरक्षा सप्ताह पंधरवड्याचा राबविण्याचा निर्णय घेतला. या पंधरवड्यामध्ये जास्तीत जास्त प्रबोधन व्हावे, जास्तीत जास्त प्रमाणात रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात यावे, जास्तीत जास्त माहिती लोकांना देता यावी, असा आपला प्रामुख्याने उद्देश होता. मधल्या काळामध्ये दोन बैठका आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील....

नॅशनल हायवे ॲथॉरिटी व पीडब्ल्यूडी यांच्या बरोबर घेतल्या. या दोन्ही खात्यांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियानासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच, रस्त्यावर सुरक्षा ठेवण्यासाठी, रस्त्यावरील साईड पट्टया करण्यासाठी, स्पीड लिमिटच्या बोर्डासाठी किंवा वेगवेगळ्या पद्धतीचे डिजिटल बोर्ड लावण्यासाठी काही उपाययोजना करता येते काय, या संदर्भात विस्तृत असा प्लॅन तयार करण्यासंबंधीच्या सूचना दिलेल्या आहेत. हा प्लॅन आल्यानंतर संपूर्ण राज्यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने जास्तीत जास्त जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने निश्चितपणे करण्यात येईल. त्याच बरोबर ड्रंक डायव्हरवर 26 हजार केसेस केलेल्या आहेत. दारू पिऊन गाडी चालविणाऱ्यां विरूद्ध कडक शासन होण्याच्या उद्देशाने नियमामध्ये कठोर तरतूद करण्यासंबंधीच्या सूचना परिवहन विभागातर्फे केंद्र सरकारला करण्यात आलेल्या आहेत.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये जास्तीत जास्त किती चाकांच्या ट्रकना परवानगी दिलेली आहे. या संबंधी एक नियम आहे. त्या प्रमाणे किती एक्सेलच्या गाड्यांना रस्त्यावर धावण्यासाठी परवानगी आहे, ज्या ट्रेलरला अपघात झाला त्या गाडीला किती चाके होती ? माझ्या माहिती प्रमाणे 22 चाके होती. त्या ट्रेलरची लांबी मोठी होती. त्याच्यावर किती टनाच्या क्वाईल्स होत्या, अवजड वाहनांना किती टनाच्या क्वाईल्स वाहण्याची परवानगी आहे ?

या नंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

त्या ट्रेलरमध्ये हेवी क्वाईल्स होत्या, तेवढया वजनाच्या क्वाईल्सची वहातूक करण्यासाठी परवानगी नव्हती. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त किती ॲक्सेलच्या गाडयांना वाहतूक करण्यासाठी परवानगी आहे त्यापेक्षा जास्त ॲक्सेलची वाहने रस्त्यावर चालतांना दिसतात. अशी वाहने चालविण्यासाठी शासनाची परवानगी नाही. त्याचप्रमाणे ओव्हर लोड मालाची वहातूक करण्याची परवानगी नसतांना तशाप्रकारची वहातूक सुरु असते.

याबाबत माझा असा प्रश्न आहे की, अशा प्रकारच्या वहातुकीकडे आरटीओ आणि पोलीस खाते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, त्यामुळे हे अपघात होत आहेत. त्या अवजड वाहनांचे चालक सुध्दा प्रशिक्षित नसतात. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर तिसऱ्या लेनमधून अवजड वाहनांनी जाणे आवश्यक असतांना ही वाहने लहान वाहनांसाठी असलेल्या पहिल्या लेनमधून परवानगी नसतांना चालविली जातात. याकडे आपले पोलीस खाते आणि आरटीओचे अधिकारी डोळे उघडे ठेवून पहात असतात. परंतु कोणतीही कारवाई करीत नाहीत. या बाबतीत शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल काय, ओव्हर लोड वाहतुकीवर बंदी घालणार काय आणि जास्तीचे ॲक्सेल असलेली अवजड वाहने महाराष्ट्रामध्ये चालविण्यासाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या ट्रेलरला 50 टनाची वाहतूक करण्याची परवानगी असतांना त्यापेक्षा जास्त वजनाचा माल त्यामध्ये होता. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत परिवहन विभागाला सूचना दिल्या जातील.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, शासनाने निवेदनात म्हटले आहे की, वाहन चालक दारु पिऊन वाहन चालवीत होता. दारु पिऊन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकाकडून अपघात झाल्यानंतर त्याला एक तासात जामीन मिळतो. अशा प्रकारची असंख्य उदाहरणे आहेत. या बाबतीत निवेदनात केंद्र सरकारकडे शिफारस केल्याचे म्हटले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या बाबतीत त्वरित निर्णय घेऊन अशा वाहन चालकांचे लायसन्स कायम स्वरुपी रद्द करण्यात येईल काय? आणि त्यांना योग्य ती कडक शिक्षा देणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मोटर व्हेईकल ॲक्टच्या माध्यमातून बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविल्याचे उत्तर दिले आहे.

28-07-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ MMP/

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, मला दोन महत्वाच्या बाबी उपस्थित करावयाच्या आहेत. वाहन चालविण्याचा परवाना नसतांना देखील अनेक वाहन चालक गाडी चालवितांना आढळतात. या करिता 8 ते 10 दिवसांची मोहिम राबवून प्रत्येक महामार्गावर पोलीस आणि आरटीओ यांनी वाहने थांबवून तपासणी केली तर त्याचा बराच फायदा होईल. त्याचप्रमाणे दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांची संख्या सुध्दा जास्त आहे. त्या करिता दहा, पंधरा ते पंचवीस किलोमीटरच्या अंतरावर वाहने थांबवून वाहन चालकांची तपासणी केली पाहिजे. आज नाशिक-इगतपुरीच्या घाटामध्ये एस.टी. बसेस थांबवून वाहन चालक दारु प्यालेला आहे काय याची तपासणी केली जाते. अशा प्रकारची मोहिम मोठया प्रमाणात राबविली तर अपघाताची संख्या खूप कमी होईल. त्यादृष्टीने आपण कारवाई करणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, प्रत्येक महामार्गावर ब्रेथ ॲनलायझ ारमार्फत तपासणी केली जाते. ही संख्या पुरेशी नसल्यामुळे ब्रेथ ॲनलायझरची संख्या जास्तीत जास्त वाढविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, युध्दामध्ये जेवढी माणसे मरत नाहीत तेवढी रस्ते आणि रेल्वे अपघातामध्ये मरत असल्यामुळे हा प्रश्न महत्वाचा झाला आहे. या निमित्ताने अनेक ठिकाणी सुरक्षा सप्ताह पाळण्यात येतात व त्या माध्यमातून वाहनांची तपासणी करण्यात येते. परंतु इतर वेळी असे सप्ताह पाळले जात नाहीत. अपघाताचे प्रमाण लक्षात घेता अशा प्रकारचे सप्ताह 365 दिवस पाळण्याची गरज आहे असे मला वाटते. माझा प्रश्न असा आहे की, वाहतूक पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये कोणताही समन्वय नाही. मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड खड्डे पडले आहेत. त्याकडे कुणीही पहाण्यास तयार नाही, या महामार्गाची लांबी देखील वाढविण्यात आलेली नाही. निवेदनात आपण समन्वय ठेवीत असल्याचे म्हटले आहे, परंतु कोणत्याही महामार्गावर समन्वय असल्याचे दिसत नाही त्यासाठी आपण तातडीने उपाय योजना करणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

कारण लवकरच गणपती उत्सव सुरु होणार आहे आणि नंतर इतरही सण आहेत. त्यामुळे लोक कोकणामध्ये मोठया प्रमाणात जात असतात. दुसरे म्हणजे या विषयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे कायदा पाठविण्यात आलेला आहे त्याबाबत काय झाले ? त्याचप्रमाणे जे बेदरकारपणे गाडी चालवितात, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते असे सांगण्यात येते. हा दंड किती आकारला जातो हे माहिती नाही. परंतु यापुढे बेदरकारपणे गाडी चालविणाऱ्यांवर कठोरपणे दंडाची आकारणी करण्यात येणार आहे काय ? यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहेत काय?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय,याबाबतीत अगोदरच कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.तसेच पहिल्यांदा, दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा पकडल्यानंतर संबंधितांचे लायसन्स रद्द करावे अशी येथे विनंती करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयाबाबत नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडियाबरोबर दोन वेळा बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच अपघात टाळण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. तसेच रस्त्यावरील खड्डयांच्या बाबतीत देखील पी.डब्ल्यु.डी.ला सूचना दिल्या जातील. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे गणपती उत्सवासाठी अनेक लोक कोकणामध्ये जात असतात. त्यामुळे त्या अनुषंगाने देखील सूचना दिल्या जातील.

श्री एस.क्यू. जमा : सभापति महोदय, हमारे वरिष्ठ सम्माननीय सदस्य श्री हेमंत टकले जी ने प्रमुख मुद्दों पर ध्यान आकर्षित किया है. मैं माननीय मंत्री महोदय को बताना चाहता हूं कि केवल गृह विभाग के जवाब से काम नहीं चलेगा. रुटीन जवाब से काम नहीं चलेगा. हिंदुस्तान में और महाराष्ट्र में सब से ज्यादा लोगों की मृत्यु रोड एक्सीडेन्ट में होती है. रोड सेफ्टी के बारे में हमारे जितने भी ट्रेडिशनल उपाय है, वह बिल्कुल इनएडीक्वेट है. उसकी बिल्कुल कमी है. रिच्युअल तरीके से जो आरटीओ विभाग काम करता है, उसकी सभी को जानकारी है कि वहां पर क्या चलता है. सुरक्षा के बारे में कैसी बात होती है, गाड़ियां कैसे पास होती है, लाइसेंस कैसे मिलते है, कितने पैसे में मिलते है, ये सारी बातें सभी को मालूम है. अगर महाराष्ट्र शासन इस बारे में गंभीर है तो रोड सेफ्टी के बारे में एक अथॉरिटी क्रिएट करनी पड़ेगी. स्टेट लेवल की ऑथॉरिटी, डिस्ट्रीक्ट लेवल की ॲथॉरिटी, जिसमें ट्रान्सपोर्ट विभाग के लोग होने चाहिए. पीडब्ल्यूडी के लोग होने चाहिए. इन सभी की एक संयुक्त कमेटी होनी चाहिए. पुलिस विभाग के

.....2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यु. जमा........

लोग होने चाहिए. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया के लोग होने चाहिए. इसके लिए हमारे जो अलग अलग कानून है, ट्रान्सपोर्ट ॲक्ट हो या अन्य कानून हों, यह बिल्कुल इनएडयुक्वेट है. यह कानून पूराने जमाने में बना था.

आज रोड का क्लासीफिकेशन बदल गया है. व्हीकल की कॅपॅसिटी बदल गई. हेवी व्हीकल आ रहे है, ट्रेलर्स आ रहे है. सब का एक ही तरह का लाइसेंस होता है. उनकी कॅपॅसिटी के बारे में हमारे वरिष्ठ साथी ने कहा कि ओवरलोड गाड़ियां चलती है. गाड़ी को इतना लोड किया जाता है कि पुल के नीचे से गाड़ी नहीं निकल पाती है. इन सारी समस्याओं की ओर ध्यान देने के लिए माननीय मंत्री महोदय से मेरे दो ही प्रश्न है. रोड सुरक्षा के बारे में आप स्टेट लेवल पर एक या दो दिन का वर्कशॉप करें. जिसमें सभी संबंधित लोगों को बुलाया जाए. विधानसभा और विधान परिषद के सम्माननीय सदस्यों को बुलाकर एक दिन का संयुक्त वर्कशॉप करें. इसमें तीन-चार विभाग के लोग होने चाहिए. नॅशनल हायवे अथॉरिटी के अधिकारी भी उसमें होने चाहिए. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या आप इस तरह का कोई वर्कशॉप करेंगे? 1 जनवरी, 2012 में आप रोड सुरक्षा सप्ताह मनाएंगे. इसमें कुछ होता नहीं है. थोड़े बहुत कार्यक्रम हो जाते है. अगले वर्ष की सुरक्षा सप्ताह की तैयारी के रुप में आप एक संयुक्त वर्कशॉप एक दिन का कीजिए. आप यह वर्कशॉप करेंगे या नहीं करेंगे ? इसमें सभी संबंधित लोगों को और जनप्रतिनिधियों को बुलाया जाए, ताकि इस बारे में विस्तृत चर्चा कर हम कानून में जो कुछ बदलाव करना चाहते है, सुरक्षा के साधनों के बारे में क्या बदलाव करना चाहते है, इस बारे में कुछ सिफारिशें की जा सके.

दूसरी बात यह है कि महाराष्ट्र शासन ने इस तैयारी के बाद एक विशेष रोड सेफ्टी के बारे में ऑथॉरिटी बनाए. सुरक्षा एन्फोर्स करने की जबाबदारी नीचे तक हो और जो इसका उल्लंघन करते है, उसको कड़ी सजा देने के बारे में फास्ट ट्रैक कोर्ट सिस्टिम होनी चाहिए. मैं एक बात बताना चाहता हूं कि कलमेश्वर के एक्सीडेंट के बारे में कहा गया. यह 12 मई का एक्सीडेन्ट है. ढ़ाई महीने के बाद उसका चार्जशीट कोर्ट में फाईल हुआ. 13 लोगों के, मृत परिवार के लोगों को इन्शुरन्स का पैसा लेने के लिए दस साल लगेंगे. आप इन्शुरन्स का पैसा लेने के संबंध में कोई फास्ट ट्रैक सिस्टिम बनाइए ताकि उनको रिलिफ मिले.

.....3.



APR/AKN/MMP पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:10

श्री एस.क्यु. जमा........

मेरा आखरी प्रश्न यह है कि आजकल के युवा विद्यार्थी टू व्हिलर चलाते है. युवा वर्ग के विद्यार्थी की जो मृत्यु होती है, उसके बारे में कहना चाहूंगा कि हेलमेट के बारे में आपका कोई कानून है या नहीं, पता नहीं. आजकल लड़के-लड़कियाँ स्कार्फ लगाकर चलते है. आतंकवाद के जमाने में यह सुरक्षा से संबंधित विषय है. इन दो-तीन प्रश्नों को ध्यान में रखते हुए एक विशेष सुरक्षा ऑथॉरिटी रोड के बारे में बनाने की सरकार की योजना है या नहीं ? इसके बारे में जवाब दिया जाना चाहिए.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयात ट्रॅफिक सेफ्टी कमिटी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यान्वित आहे आणि त्यामध्ये सर्व विभागाचे लोक अंतर्भूत आहेत. ते या कमिटीच्या वेळोवेळी बैठका घेऊन या संबंधीची चर्चा करीत असतात. सन्माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी निश्चितपणे लेखी स्वरुपात द्याव्यात. त्या सूचना सुरक्षा सप्ताहामध्ये इनकॉर्पोरेट करण्याचा प्रयत्न निश्चितपणे राहील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी इन्शुरन्सच्या संदर्भात एक महत्वाचा विषय मांडलेला आहे. अपघात झाल्यानंतर कॉम्पेन्सेशनचा विषय सर्वच ठिकाणी चर्चेला येतो आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपल्याला त्या चर्चेला सामोरे जावे लागते. या दृष्टिकोनातून इन्शुरन्सच्या संदर्भात कायम स्वरुपी काही करता येईल काय याबाबत मी कालच माहिती घेतलेली आहे. सन 1939,1988 आणि 1994 मध्ये अशा प्रकारे तीन वेळा मोटार व्हेईकल ॲक्टमध्ये दुरुस्त्या केलेल्या आहेत. मोटार व्हेईकल ॲक्ट आणि महाराष्ट्र मोटार व्हेईकस रुल्स आहेत. त्यापैकी महाराष्ट्र मोटार व्हेईकल्स रुल्समध्ये बदल करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाला निश्चितपणे आहेत. त्यामुळे या रुल्समध्ये महाराष्ट्र शासनाने काही बदल केलेले आहेत. इन्शुरन्सच्या क्लेमचा निर्णय होईपर्यत मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना 50 हजार रुपये त्वरित देण्यात यावेत आणि जखमींसाठी यापूर्वी 12 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येत होती ती 25 हजार रुपये देण्यात यावी, अशा पध्दतीची तरतूद रुल्समध्ये करण्यात आलेली आहे. परंतु सन्मानीय सदस्य श्री. ज़मा यांनी या ठिकाणी जे सांगितले आहे ती वस्तुस्थिती खरी आहे. चार्जशीट देईपर्यंत साधारणपणे दोन ते अडीच महिने निघून जातात. तेव्हा हा कालावधी कमी करता येईल काय किंवा कुठल्या पध्दतीने हा कालावधी कमी करता येईल, या बाबतीत मी चर्चा केलेली आहे आणि त्या दृष्टीने अधिवेशन संपल्यानंतर परिवहन खाते असेल किंवा ज्या प्राधिकरणाच्या माध्यमातून, न्यायाधीकरणाच्या माध्यमातून इन्शुरन्सचे क्लेम निकाली काढले जातात ते लवकरात लवकर कसे निकाली काढता येतील, यासाठी वेगळया पध्दतीचे नियोजन करण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने निश्चितपणे केला जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जेव्हा थर्डपार्टी इन्शुरन्ससाठी आपण क्लेम करतो त्यावेळी ज्यांनी अपघात केलेला असतो आणि ज्याच्यावर आपण क्लेम करतो तो आपली नोटीस सुध्दा घेत नाही, अशा वेळी आपल्यालाच सांगितले जाते की, तुम्ही नोटीस नेऊन

श्रीमती शोभा फडणवीस....

पोहचवा मगच आम्ही केस करु. सभापती महोदय, रिक्षात बसणारी माणसे कोण असतात? ती माणसे अतिशय गरीब असतील तर त्यांना थर्ड पार्टी इन्शुरन्स काय आहे हेही कळत नाही. फॉर्म कसा भरावा हेही कळत नाही. ही सगळी कामे करण्यासाठी काही व्यवस्था करुन त्या गरीब माणसांना खऱ्या अर्थाने नुकसान भरपाई मिळेल यासाठी हे नियम साधेसोपे करण्यात येतील काय? या गरीब माणसाला नोटीस नेऊन देण्यास सांगितले तर ज्याला नोटीस द्यायची असते तो मोठा माणूस असतो. ट्रेलर लहान माणसाकडे नसतो. तो नोटीस घेण्यास तयार होत नाही इतकेच नाही तर मारण्या करिता गुंड ठेवले जातात. मारण्या करिता गुंड ठेवल्यानंतर गरीब माणूस त्याला नोटीस नेऊन देऊ शकत नाही. पोलीस सोबत येत नाही. समज द्यायलाही कोणी येत नाही. अशा पध्दतीची जी यंत्रणा आहे त्यात आपण बदल करुन गरिबांना खऱ्या अर्थाने विमा पॉलिसीचा फायदा होईल, या करिता नियमामध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. हा प्रश्न उपस्थित झाल्या नंतर मी या प्रश्नाची माहिती घेण्यास सुरुवात केली होती. इन्शुरन्सच्या माध्यमातून अपघातग्रस्त कुटुंबाला लवकरात लवकर मदत कशी करता येईल, या दृष्टीने माझा प्रयत्न आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर परिवहन खाते, विधी व न्याय खाते या सर्वांना एकत्रित बोलावून कायम स्वरुपी हा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यात येईल. नोटीस पोहचविण्याच्या संदर्भातील अडचणी दूर करुन चार्जशीट लवकरात लवकर फाईल करुन त्याची प्रत त्याला दिली पाहिजे. रुग्ण दवाखान्यात असल्यानंतर जोपर्यंत त्याला डिस्चार्ज मिळत नाही तोपर्यंत तो क्लेम सादर करु शकत नाही. परंतु रुग्ण दवाखान्यात आसतानाच त्याला क्लेम सादर करता आला पाहिजे, अशा वेगवेगळया अनुषंगाने हे अधिवेशन संपल्यानंतर एक बैठक घेऊन या संदर्भात विस्तृत पॉलिसी तयार करण्यात येईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. त्यापैकी पहिला प्रश्न असा की, आपण अनेक वेळा हाय-वे वरुन, एक्सप्रेस-वे वरुन प्रवास करीत असताना अनेक ठिकाणी पोलिसांचे जथ्थे उभे असलेले दिसतात.

यानंतर श्री. बरवड....

अशुध्दमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

अनेक ट्रक्स ते थांबवित असतात आणि त्यांची कागदपत्रे तपासत असतात. हे जत्थे कोठे उभे राहणार आहेत, कोण कोण उभे राहणार आहेत, याची डायरी एंट्री असते का ? ज्या ज्या वाहनांची ते तपासणी करतात त्या वाहनांचा रेकॉर्ड मेन्टेन करतात का ? एका ठिकाणी उभे राहून तपासणी केल्यानंतर थोडे पुढे गेल्यानंतर जर त्या वाहनाचा अपघात झाला किंवा त्या वाहनाने अपघात केला आणि चौकशीमध्ये जर असे लक्षात आले की, ते वाहन फीट नव्हते, ते वाहन अनफीट होते म्हणून अपघात झाला, गाडीमध्ये काही तरी दोष होता म्हणून अपघात झाला, हे आपण कशा पध्दतीने तपासणार आहात ? क्रॉस एक्झामिनेशन कशा पध्दतीने करणार आहात ? अनेक वेळा ते कॉईल्स घेऊन जातात किंवा मोठमोठे जे मल्टीॲक्सल वाहने आहेत ते कॉईल्स किंवा इतर गोष्टींची वाहतूक करतात, त्यांच्यासाठी काही तरी सेफ्टी नॉर्म्स निश्चितपणे असणार. त्या सेफ्टी नॉर्म्सचे पालन ते करतात का ? काही वेळा मी स्वत: पाहिलेले आहे. कोकणच्या हायवेवरुन येत असताना जी स्टील फॅक्टरी आहे, तेथून ज्या कॉईल्सची वाहतूक होते त्यामध्ये काही कॉईल्स रस्सीने बांधलेल्या असतात तर काही कॉईल्स साखळीने बांधलेल्या असतात. त्यामुळे ते सेफ्टी नॉर्म्सचे पालन करतात की नाही, याचे इन्स्पेक्शन करण्यात येते का, जर त्याचे इन्स्पेक्शन करण्यात येत असेल तर त्याचा रेकॉर्ड कशा पध्दतीने मेन्टेन करण्यात येतो ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती एवढी वाढलेली आहे की, परिवहन खात्याच्या संदर्भातील काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात येत आहेत. पोलीस म्हणून ज्या उपाययोजना आम्हाला करता येतील त्या करण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने प्रयत्न चालू आहे. या अनुषंगाने मघाशी जे प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत त्या बाबतीत परिवहन खात्याशी चर्चा करुन ज्या काही कायमस्वरुपी उपाययोजना करता येतील त्या करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितले की, पोलिसांमार्फत ज्या काही योजना करावयाच्या आहेत त्या निश्चितपणे करीत आहेत. मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, तीन आठवड्यांपूर्वी नाशिक येथे एक पोलीस अधिकारी, ज्यांची बदली नवी मुंबई येथे झाली आहे, ते दारुच्या नशेमध्ये इतक्या भरधाव वेगाने

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

श्री. जयवंतराव जाधव ....

चालले होते की, त्यांनी 6 वर्षाच्या एका मुलीला जोरात उडवले. ती मुलगी एका पोलवर आदळली. तो अधिकारी एवढा नियंत्रणाच्या बाहेर होता की, त्याने परत दोनतीन वेळा त्या मुलीच्या अंगावर गाडी घातली. त्यामुळे ती मुलगी जागीच गतप्राण झाली. आपण पोलिसांच्या उपाययोजना सांगतो. पोलिसींग कसे करावयाचे आहे, पोलिसांनी काय करावयाचे आहे या बाबत आपण सांगतो पण पोलीसच जर दारु पिऊन लोकांचे जीव घ्यावयास निघाले असतील तर मंत्री म्हणून या बाबतीत त्या पोलीस अधिकाऱ्याला निलंबित केले का ? दारु प्यालेल्या अवस्थेमध्ये असलेल्या पोलीस अधिकाऱ्याची जेव्हा वैद्यकीय तपासणी केली तेव्हा त्याचा रिपोर्ट निल आला. नागरिकांनी स्वत: त्या ठिकाणी बघितले. त्या ठिकाणी आमचे जे कार्यकर्ते उपस्थित होते त्यांनी बघितले. दारुच्या नशेत गाडी चालविणे तर सोडाच पण त्याला उभेही राहता येत नव्हते. अशा अवस्थेत तो गाडी चालवित होता. तरी सुध्दा दुसऱ्या दिवशी तो जामिनावर सुटतो आणि परत त्याच्या नोकरीवर रुजू होतो. अशा वेळी सर्वसामान्य नागरिकांनी शासनाकडून काय अपेक्षा करावी ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, घडलेली घटना दुर्दैवी आहे. त्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. परंतु चौकशी करुन अधिकची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, निवेदनामध्ये सव्वासात लाखाच्या दरम्यान केसेस दाखल केल्याचे नमूद केले आहे. नियमांचे उल्लंघन करण्याच्या संदर्भात इतक्या मोठ्या प्रमाणात केसेस दाखल होत असतील तर असे गुन्हे होऊ नये या दृष्टीने त्यावर उपाययोजना म्हणून शासनासमोर काही ठोस कार्यक्रम निर्धारित केले आहेत का ? उदा. जे वाहनधारक आहेत, वाहन चालक आहेत, त्यांनी मद्यपान करुन वाहन चालविण्याच्या बाबतीत 22 हजार केसेस दाखल झ ालेल्या आहेत, असे निवेदनात नमूद केले आहे.पण दाखल न झालेल्या केसेस किती आहेत ? ही बाब आपण जर इतकी लाईटली घेणार असू तर ते चालणार नाही. शासन म्हणून आणि विशेषत: पोलीस खाते म्हणून मद्यपान करुन वाहन चालविण्यावर नियंत्रण आणण्यासाठी त्यांची दर महिन्याला रक्ताची तपासणी करणे किंवा रस्त्यावर चेकपोस्टवर तपासणी करणे, मद्यपान करणाऱ्यावर गुन्हे दाखल करणे याची शासन काही विशेष मोहीम राबविणार आहे का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या चालकांची तपासणी करण्याची मोहिम सातत्याने चालू असते. शुक्रवार, शनिवार व रविवार या दिवशी ही मोहिम तीव्र केली जाते. यामध्ये बदल करण्याची विनंती राज्य शासनाने केंद्र शासनाला केलेली आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य सुरक्षा रक्षक मंडळाच्या सभासदत्वासाठी असलेल्या शैक्षणिक अर्हतेत करण्यात आलेला बदल

**मु. शी.** : राज्य सुरक्षा रक्षक मंडळाच्या सभासदत्वासाठी असलेल्या शैक्षणिक अर्हतेत करण्यात आलेला बदल यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-----

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.25 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : माझ्याकडे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची एक सूचना आलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर व रामनाथ मोते यांनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी जागा देण्याच्या बाबतीत होत असलेली टाळाटाळ या विषयासंबंधी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या संदर्भात एक-दोन मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा गिरणी कामगारांचा प्रश्न उपस्थित होत असतो. किती वर्षे हा प्रश्न शासन प्रलंबित ठेवणार आहे ? 1982 मध्ये गिरणी कामगारांचा संप झाला. त्यानंतर जाणीवपूर्वक गिरण्या बंद पाडण्यात आल्यामुळे अडीच लाख गिरणी कामगारांवर उपासमारीची पाळी आली. गिरण्या तोट्यात दाखवून त्या बंद करण्यात आल्या. गिरण्यांच्या जमिनीतील 1/3 भाग मुंबई महानगरपालिकेसाठी, म्हाडाला 1/3 भाग कामगारांना घरे बांधून देण्यासाठी व उर्वरित भाग गिरणी मालकांना व्यावसायिक वापरासाठी देण्याची अट घालण्यात आली. हा जो काही करार करण्यात आला त्याचे काहीच पालन झाले नाही. हे गिरणी कामगार आज देशोधडीला लागलेले आहेत. त्यांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत. असे असताना सरकारने या गिरणी कामगारांची कोणतीही दखल घेतलेली नाही. गिरणी कामगारांनी त्यांच्या मागण्यांसाठी या विधान भवनावर अनेक वेळा मोर्चे काढलेले आहेत. आज देखील गिरणी कामगारांचा एक प्रचंड असा महामोर्चा विधान भवनावर आलेला आहे. गिरणी कामगारांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. किती गिरणी कामगारांचे संसार हे सरकार उघड्यावर पाडणार आहे ? तेव्हा या विषयावर तातडीने चर्चा करुन उपाययोजना करण्यासाठी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 150 वर्षापूर्वी या देशाला औद्योगिक स्वरुप प्राप्त करुन देणा-या गिरण्या मुंबईमध्ये चालू झाल्या. ही मुंबई मिळविण्यासाठी गिरणी कामगारांनी रक्त सांडलेले आहे. मुंबईतील गिरण्या ह्या या मुंबईचे वैभव असल्याचे आख्ख्या जगाला ज्ञात आहे. असा हा मुंबईतील गिरण्या आणि गिरणी कामगारांचा विषय आहे. सरकारच्या दुर्दैवी धोरणामुळे गिरणी कामगार आणि गिरणगाव पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. 1981ला झालेल्या संपानंतर देशोधडीला लागणे म्हणजे काय याचा प्रत्येक गिरणी कामगाराच्या कुटुंबाने अनुभव घेतलेला आहे. 1981नंतर आजपर्यंत गिरणी कामगार त्यांच्या मागण्यासाठी विविध संघटनांच्या माध्यमातून सतत झगडत आहेत. काँग्रेसने तोडा, फोडा ही नीती अवलंबून विविध संघटनांना चुचकारत या गिरणी कामगारांना एकत्र येऊ दिले नाही. आता गिरणी कामगारांच्या सर्व संघटनांच्या आणि नेत्यांच्या लक्षात आले की त्यांच्या कृतीमुळे गिरणी कामगारांचे प्रश्न मार्गी लागत नाहीत. म्हणून काँग्रेस सोडून गिरणी कामगारांच्या सर्व संघटना एकत्र आलेल्या आहेत. या सर्व संघटना एकजूट करुन आपले गा-हाणे सरकार दरबारी मांडण्यासाठी आर या पार या भूमिकेतून एक भव्य मोर्चा विधान भवनावर घेऊन येत आहेत.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्या वेळेला त्यांच्या गाऱ्हाण्याची चर्चा होणे आवश्यक आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना अवघड झालेले दुखणे सरकारचे असले तरी गिरणी कामगारांचे सुध्दा देशोधडीला लागल्याचे दुखणे आहे त्या संदर्भात सरकारने धोरणात्मक भूमिका घेतली पाहिजे. त्या भावनेतून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या विषयावर तातडीने चर्चा होणे आवश्यक आहे. ज्यांच्या जिवावर मुंबई मिळविली, महाराष्ट्र मिळविला त्या विधिमंडळाच्या सभागृहात आम्ही सन्मानाने बसणार असू तर त्यांच्या रक्ताची आठवण, बलिदानाची आठवण ठेवण्यासाठी ही चर्चा झाली पाहिजे. तातडीने गिरणी कामगारांच्या भावना सरकारच्या लक्षात आणून देऊन सरकारची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आपण या विषयावरील चर्चा स्वीकारावी आणि या सदनाचा सन्मान करावा अशी विनंती करतो.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, कामकाज पत्रिकेवरील बाब क्रमांक एक ते चार पर्यंतचे कामकाज पूर्ण करुन घेऊ. मागील दोन दिवस प्रश्नोत्तराचा तास व लक्षवेधी सूचनांवर चर्चा होऊ शकलेली नाही. आज सकाळी सभागृहाच्या विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचनांवर चर्चा घेण्यात आली. गिरणी कामगारांच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्याची आणि चर्चेला उत्तर देण्याची शासनाची तयारी आहे. परंतु अगोदर प्रश्नोत्तराचा तास व लक्षवेधी सूचनांचे कामकाज पूर्ण करुन नंतर चर्चा घेण्यास सत्ताधारी पक्षाची सहमती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे त्यामध्ये तातडी आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर अनेक राजकीय पक्षाच्या लोकांनी एकत्र येऊन एक महामोर्चा आयोजित केलेला आहे. या घटनेशी शासनाचा डायरेक्ट संबंध आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे, या विषयाबाबत तातडी आहे. मागील 30 वर्षात गिरणी कामगार उद्ध्वस्त झाला आहे. सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून नियम 289 च्या स्थगन प्रस्तावावरील सूचना स्वीकारुन चर्चा घेण्यात यावी अशी मी विनंती करतो. आपण स्वत: पुढाकार घेऊन शासनाला चर्चा घेण्यास भाग पाडावे. या शासनाला संवेदना नाहीत. गिरणी कामगारांच्या

..2..

श्री.रामदास कदम.....

घरासाठी गिरण्यांच्या जमिनी उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. या जमिनी बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम शासनाने केले आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावरील चर्चा स्वीकृत करण्यात यावी, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

**सभापती** : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी जी सूचना देण्यात आली आहे त्या सूचनेतील विषय हा कष्टकरी कामगारांचा आहे. गिरणी कामगारांनी खऱ्या अर्थाने मुंबईला घडविले, मुंबई राज्याला आणि महाराष्ट्राला घडविले आहे हे नाकारता येणार नाही. सामाजिक बांधिलकी या दृष्टीने या प्रस्तावाकडे आपण सर्वांनी पाहणे गरजेचे आहे. या सदनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, संसदीय कार्यमंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी आपापल्या भावना या सूचनेच्या अनुषंगाने मांडल्या आहेत. हा महत्वाचा इश्यू असल्यामुळे गिरणी कामगारांच्या प्रश्नावर चर्चा करण्यास सगळ्यांनीच संमती दर्शविली आहे. मी स्वत: देखील तो विचार करीत आहे. परंतु अधिवेशन सुरु झाल्यापासून मागील दोन दिवस प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात आला होता. त्या त्या दिवसाचे प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न अत्यंत महत्वाचे होते. तरी देखील आपण प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न देखील तितकेच महत्वाचे आहेत. माझी सदनाला विनंती आहे की, गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत आपण जरुर चर्चा घेऊ, परंतु ही चर्चा घेत असताना सभागृहापुढील प्रश्नोत्तराचा तास देखील तितकाच महत्वाचा आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ........

त्या प्रश्नोत्तरांवर सभागृहात आपण चर्चा करु, त्यानंतर कामकाज पत्रिकेतील इतर कामकाज, लक्षवेधी सूचना व अन्य कामकाज काही काळ थांबवून दीड तास तरी चर्चा या प्रश्नावर करु.

श्री. दिवाकर रावते : महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुध्दा न घेता प्रथम गिरणी कामगारांच्या विषयावर चर्चा करु, त्यानंतर इतर कामकाज घ्यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात माननीय संसदीय कामकाज मंत्री, माननीय गृह मंत्री, माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते अशा प्रमुख नेत्यांसोबत चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी मी 10 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 11.55 ते 12.05 पर्यंत बैठक स्थगित झाली )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 12.05 ते 12.25 पर्यंत स्थगित झाली.)

---

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.25 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

**तालिका सभापती** : सभागृहाचे बैठक 1.30 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.00 ते 1.30 वाजेपर्यंत बैठक स्थगित झाली)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी - तालिका सभापती - श्री.रमेश शेंडगे**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 01.30 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे</u>**

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुनः भरेल.

( दुपारी 2.00 ते 2.30 मध्यंतर )

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

( माननीय सभापती आसनस्थ होताच दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देण्यास सुरुवात करतात )

**पृ. शी. / मु. शी.** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. उल्हास पवार ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, शुक्रवार, दिनांक 29 जुलै, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 28 जुलै, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**शुक्रवार, दिनांक 25 मार्च, 2011 रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव**

1) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 18 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 22 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**बॅलेटव्दारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**

1) श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 84 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 27 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 7 - 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात करतात )

**सभापती** : सभागृहाची बैठक आता मी स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक 29 जुलै, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 33 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 29 जुलै, 2011 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही